RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक २५(६)] सोमवार, फेब्रुवारी १६, २०२६/माघ २७, शके १९४७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ९८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महिला व बाल विकास विभाग

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ फेब्रुवारी,२०२६.

**अधिसूचना**

**आधार (आर्थिक आणि इतर अनुदाने, लाभ आणि सेवांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.**

क्रमांक एबाव‍ि २०२६/प्र.क्र.१९/का-०६.— ज्याअर्थी शासकीय सेवा किंवा लाभ किंवा अनुदाने उपलब्ध करून देताना ओळखपत्र म्हणून आधारचा वापर केल्याने शासकीय प्रक्रिया सोपी होते, पारदर्शकता आणि परिणामकारकता येते, लाभार्थ्यांना त्यांचे लाभ सुविधाजनकरीत्या प्रत्यक्षपणे मिळणे सुलभ होते, आणि आधारमुळे ओळख सिध्द करण्यासाठी एकापेक्षा जास्त दस्तावेज सादर करण्याची गरज दूर होते;

आणि ज्याअर्थी, महिला व बाल विकास विभाग (यापुढे ज्याचा "विभाग" असा उल्लेख करण्यात येत आहे) पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक १ एप्रिल,२०२३ रोजी व त्यानंतर जन्माला येणा-या मुलीस जन्मापासून ते १८ वर्षे वयापर्यंत आर्थिक सहाय्य देण्यासाठी 'लेक लाडकी योजना' (यापुढे ज्याचा "योजना" असा उल्लेख करण्यात येत आहे) राबवित आहे, जिची अंमलबजावणी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई (यापुढे ज्यांचा "अंमलबजावणी यंत्रणा" असा उल्लेख करण्यात येत आहे) यांचेकडून होत आहे;

आणि ज्याअर्थी, योजनेच्या उपलब्ध मार्गदर्शक सूचनांनुसार, पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी व त्यानंतर जन्माला येणा-या मुलीस जन्मापासून ते १८ वर्षे वयापर्यंत खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार आर्थिक सहाय्य (यापुढे ज्याचा "लाभ" असा उल्लेख करण्यात येत आहे) देण्यात येते :—

| अ.क्र. | लाभाचे टप्पे | लाभ (रुपये) |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्यांच्या जन्मावेळी | ५००० |
| २. | लाभार्थींच्या इयत्ता १ ली मधील नोंदीवेळी | ६००० |
| ३. | लाभार्थींच्या इयत्ता ६ वी मधील नोंदीवेळी | ७००० |
| ४. | लाभार्थींच्या इयत्ता ११ वी मधील नोंदीवेळी | ८००० |
| ५. | लाभार्थींचे वय वर्षे १८ पूर्ण झाल्यानंतर | ७५००० |

आणि ज्याअर्थी, उपरोक्त योजनेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीमधून आवर्ती खर्च करणे समाविष्ट आहे;

त्यामुळे आता, आधार (आर्थिक आणि इतर अनुदाने, लाभ आणि सेवांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ (२०१६ चा १८) च्या कलम ७ मधील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे.:-

१. (१) योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र असलेली व्यक्ती आधार क्रमांक बाळगत असल्याचा पुरावा सादर करेल किंवा आधार अधिप्रमाणन करेल;

(२) योजनेअंतर्गत लाभ मिळवण्यासाठी इच्छुक असलेली कोणतीही व्यक्ती, जिच्याकडे आधार क्रमांक नाही किंवा जिने अद्यापि आधार नोंदणीसाठी अर्ज केलेला नाही, तिने योजनेसाठी नोंदणी करण्यापूर्वी आधार नोंदणीकरिता अर्ज करणे आवश्यक असेल, परंतु असे की, ती उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये आधार मिळविण्यास हक्कदार असणे आवश्यक असेल, आणि अशा सर्व व्यक्ती, आधार नोंदणीसाठी अर्ज करण्याकरता नजीकच्या कोणत्याही आधार केंद्रास (UIDAIच्या *www.uidai.gov.in* या संकेतस्थळावर यादी उपलब्ध) भेट देतील

(३) आधार (नोंदणी आणि अद्ययावत) विनियम, २०१६ च्या नियम १२ नुसार, अद्याप आधार नोंदणी न केलेल्या लाभार्थीसाठी संबंधित ब्लॉक किंवा तालुका किंवा तहसीलमध्ये आधार नोंदणी केंद्र उपलब्ध नसल्यास विभागाने अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून किंवा UIDAI च्या विद्यमान निबंधकांच्या समन्वयाने किंवा स्वतंत्र UIDAI रजिस्ट्रार बनून सोयीच्या ठिकाणी नावनोंदणी सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे

परंतु व्यक्तीला आधार मिळेपर्यंत खालील ओळखपत्रे सादर करण्याच्या अधीन राहून अशा व्यक्तींना योजनेचा लाभ देण्यात येईलः-

(अ) जर तिने नावनोंदणी केली असेल, तर त्यांची आधार नोंदणी आयडी स्लिप, आणि

(ब) पुढीलपैकी कोणतेही एक कागदपत्रः-

(i) छायाचित्र असलेले बँक किंवा पोस्ट पासबुक, किंवा

(ii) शिधापत्रिका; किंवा

(iii) **राजपत्रित** अधिकारी किंवा तहसीलदार यांनी निर्गमित केलेले छायाचित्र असलेले अधिकृत लेटर हेडवरील ओळख प्रमाणपत्र,किंवा

(iv) इयत्ता १ ली नंतर पुढील टप्प्यांच्या बाबतीत शाळेने दिलेले बोनाफ़ाईड प्रमाणपत्र, किंवा

(v) अंतिम लाभावेळी लाभार्थ्यांचे अविवाहित असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र; किंवा

(vi) विभागाने विहित केलेले इतर कोणतेही दस्तऐवज

परंतु पुढे असे की, वरील कागदपत्रे त्या प्रयोजनासाठी राज्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे तपासली जाऊ शकतात.

२. योजनेंतर्गत, लाभार्थ्यांना सहजरीत्या लाभ मिळावा यासाठी उक्त आवश्यक बाबींबाबत लाभार्थींना माहिती करून देण्याकरिता प्रसिद्धी माध्यमांमधून व्यापक प्रसिद्धी करण्यात येईल याची विभाग आपल्या अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून व्यवस्था करेल.

३. लाभार्थींच्या खराब बायोमेट्रिक्समुळे किंवा कोणत्याही कारणामुळे आधार प्रमाणीकरण अयशस्वी झाल्यास, अशा सर्व प्रकरणांमध्ये, खालील उपाययोजना अवलंबण्यात येतील

(अ) बोटांच्या ठशांची गुणवत्ता खराब असल्यास, सुविधाजनक लाभ प्रदानाकरिता, प्रमाणीकरणासाठी एकत्रित जोखीम माहिती प्रणाली (IRIS) स्कॅन किंवा चेहरा अधिप्रमाणन सुविधा अवलंबण्यात येईल, त्याद्वारे विभाग त्याच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून IRIS स्कैनर किंवा चेहरा अधिप्रमाणनासहीत बोटांच्या ठश्यांद्वारे अधिप्रमाणनाची व्यवस्था करेल,

(ब) बोटांचे ठसे किंवा IRIS स्कॅन किंवा चेहरा अधिप्रमाणन इ. च्या माध्यमातून बायोमेट्रिक अधिप्रमाणन यशस्वी न झाल्यास, शक्य आणि अनुज्ञेय असेल तेथे प्रकरणपरत्वे, वन टाइम पासवर्ड किंवा मर्यादित वेळ वैधता असलेले कालावधी-आधारित वन-टाइम पासवर्डद्वारे अधिप्रमाणन उपलब्ध करून देण्यात येईल,

(क) बायोमेट्रिक किंवा आधार वन-टाइम पासवर्ड किंवा कालावधी-आधारित वन-टाइम पासवर्ड इ.च्या माध्यमातून प्रमाणीकरण शक्य नाही, अशा इतर सर्व प्रकरणांमध्ये आधार पत्रावर छापण्यात आलेल्या क्यूआर कोडच्या आधारे ज्यांची अधिकृतता तपासली जाऊ शकते अशा भौतिक आधार पत्रांच्या आधारे योजने अंतर्गत लाभ दिले जाऊ शकतात आणि विभाग, अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून सोयीच्या ठिकाणी क्यूआर कोड रीडरची व्यवस्था करेल.

४. उपरोक्त मुद्यांव्यतिरीक्त, कोणतीही वास्तविक लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये याकरिता, विभाग अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून डीबीटी मिशन, कॅबिनेट सचिव, भारत सरकार यांचे कार्यालयीन आदेश, दि. १९ डिसेंबर, २०१७ मध्ये आखून दिलेल्या अपवाद हाताळणी प्रणालीचे अनुसरण करेल.

५. ही अधिसूचना महाराष्ट्र राज्यातील अधिकृत **राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

**विलास ठाकूर,**
शासनाचे सहसचिव.

## WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT

3rd Floor, New Administration Building, Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, dated 16th February, 2026.

*NOTIFICATION*

THE AADHAAR (TARGETED DELIVERY OF FINANCIAL AND OTHER SUBSIDIES, BENEFITS AND SERVICES) ACT, 2016.

No. ICDS-2026/CR19/Desk 06.— Whereas, the use of Aadhaar as identity document for delivery of services or benefits or subsidies simplifies the Government delivery processes, brings in transparency and efficiency and enables beneficiaries to get their entitlements directly in a convenient and seamless manner by obviating the need to produce multiple documents to prove one's identity ;

And whereas, the Women and Child Development Department (hereinafter referred to as the "Department") is administering the 'Lek Ladki Scheme' (hereinafter referred to as the "Scheme") to provide financial assistance to the girl child who has been born on or after the 1st April 2023 in the family holding yellow or orange ration card, between the age group from birth till 18 years of age, which is being implemented by Commissioner, Integrated Child Development Service Scheme, Maharashtra State, Navi Mumbai.( hereinafter referred to as the " implementing Agency").

And whereas, under the scheme, financial assistance as specified in the table below (hereinafter referred to as the "benefit") is given to the girl child who has been born on or after the 1st April,2023 in the family holding yellow or orange ration card, between the age group from birth till 18 years of age (hereinafter referred to as the "beneficiaries") as per the extent Scheme guidelines, as follows:—

| Sr. No. | Stage of the Scheme for availing benefit | Amount (in rupees) |
|---|---|---|
| 1. | At birth of beneficiary | 5000 |
| 2. | At the time beneficiary enrolled in 1st standard | 6000 |
| 3. | At the time beneficiary enrolled in 6th standard | 7000 |
| 4. | At the time beneficiary enrolled in 11th standard | 8000 |
| 5. | At the time beneficiary completed 18 years of age | 75000 |

And whereas, the aforesaid Scheme involves recurring expenditure incurred from the Consolidated Fund of the State of Maharashtra.

Now, therefore, in pursuance of the provisions of the section 7 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 (18 of 2016), the Government of Maharashtra hereby notifies the following, namely:-

1. (*1*) An individual eligible for receiving the benefit under the Scheme shall be required to furnish proof of possession of Aadhaar number or undergo Aadhaar authentication;

(*2*) Any individual desirous of availing benefit under the Scheme, who does not possess the Aadhaar number or, has not yet enrolled for Aadhaar, shall be required to make application for Aadhaar enrolment before registering for the Scheme provided that she is entitled to obtain Aadhaar as per section 3 of the said Act, and such individuals shall visit any Aadhaar enrolment centre [list available at the Unique Identification Authority of India (UIDAI) *website www.uidai.gov.in*] to get enrolled for Aadhaar;

(3) As per regulation 12 of the Aadhaar (Enrolment and Update) Regulations, 2016, the Department through its implementing Agency, is required to offer Aadhaar enrolment facilities for the beneficiaries who are not yet enrolled for Aadhaar and in case there is no Aadhaar enrolment centre located in the respective Block or Taluka or Tehsil, the Department through its implementing Agency shall provide Aadhaar enrolment facilities at convenient locations in coordination with the existing Registrars of UIDAI or by becoming a UIDAI Registrar itself:

Provided that till the time Aadhaar is assigned to the individual, benefits under the Scheme shall be given to such individual, subject to the production of the following documents, namely:-

(*a*) if she has enrolled, her Aadhaar Enrolment Identification Slip; and

(*b*) any one of the following documents, namely :—

(I) Bank or Post Office Passbook with Photo; or

(II) Ration Card; or

(III) Certificate of identity having photo of such person issued by a Gazetted Officer or a Tehsildar on an official letter head; or

(IV) Bonafied Certificate issued by School to beneficiary in case of 1st standard and thereafter stages ; or

(V) Self declaration for being unmarried in case of the beneficiaries availing last installment; or

(VI)any other document as specified by the Department:

Provided further that, the above documents may be checked by an officer specifically designated by the Department for that purpose.

2. In order to provide benefit to the beneficiaries under the Scheme conveniently, the Department through its implementing Agency shall make all the required arrangements to ensure that wide publicity through the media shall be given to the beneficiaries to make them aware of the said requirement.

3. In all cases, where Aadhaar authentication fails due to poor biometrics of the beneficiaries or due to any reason, the following remedial mechanisms shall be adopted, namely :—

(*a*) in case of poor fingerprint quality, Integrated Risk Information System (IRIS) scan or face authentication facility shall be adopted for authentication, thereby the Department through its implementing Agency shall make provisions for (IRIS) scanners or face authentication along with finger-print authentication for delivery of benefits in a seamless manner ;

(*b*) in case the biometric authentication through fingerprints or (IRIS) scan or face authentication is not successful, whenever feasible and admissible authentication by Aadhaar One-Time Password or Time-based One-Time Password with limited time validity, as the case may be, shall be offered ;

(*c*) in all other cases where biometric or Aadhaar One-Time Password or Time-based One-Time Password authentication is not possible, benefit under the Scheme may be given on the basis of physical Aadhaar letter whose authenticity can be verified through the Quick Response (QR) Code printed on the Aadhaar letter and the necessary arrangement of Quick Response Code reader shall be provided at the convenient locations by the Department through its implementing Agency.

4. In addition to the above, in order to ensure that no bonafide beneficiary under the Scheme is deprived of his due benefit, the Department through its implementing Agency shall follow the exception handling mechanism as outlined in the Office Memorandum of DBT Mission, Cabinet Secretariat, Government of India, dated 19th December 2017.

5. This notification shall come into effect from the date of its publication in the *Maharashtra Government Official Gazette.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS THAKUR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.